

# ॥ मोक्षप्राप्तीचे रहस्य ॥

सद्गती आणि परमपदाची प्राप्ती व्हावी अशी ज्यांची खरी तीव्र इच्छा असेल त्यांनी सदासर्वदा अखंड रामनामाचें स्मरण करावे. श्रीरामाची निष्काम आणि दंभविरहित भक्ती करून कृतार्थ व्हावे. या घोर कलियुगात उद्धरून जाण्यासाठी भगवद्भक्ती आणि रामनामस्मरण याशिवाय अन्य कुठलाच उपाय नाही.

आयुष्याचा भरंवसा नाही; म्हणून शक्य तितक्या त्वरेने व तळमळीने कृतार्थ होण्याचा प्रयत्न करावा. परमार्थप्राप्तीचे सर्वश्रेष्ठ साधन सत्संगती हे होय. सत्संगतीच्या योगाने असंख्य लोक उद्धरून गेले. भूतदया, क्षमा, शांती, विवेक, वैराग्य, समाधान, प्रवृत्तीमार्गाचा त्याग, निवृत्तीमार्गाचे आचरण, इत्यादी अनेक गोष्टी सत्संगाने अनायासे साध्य होतात आणि कामक्रोधादि षड्रिपु, परमार्थाला विघातक असे दंभ, अहंकार, आपोआप लयास जातात. सत्संगाचा महिमा खरोखर अपार आहे. संताच्या संगतीत सदैव भगवद्चर्चा, भगवद्गुणसंकीर्तन, रामनामस्मरण आणि सदुपदेश चालत असल्यामुळे त्याच्या सान्निध्यांत राहणाऱ्याच्या कानी हेच पडत राहते आणि त्यायोगे त्याचे चित्त परमात्म्याशी तद्रूप होऊन जाते.

विषयासक्त वृत्तीने बंधन निर्माण होते, तर वृत्ती भगवंताकडे लावल्याने मोक्षलाभ होतो. वृत्ती विषयासक्त न होण्यास भगवंताचे अनुसंधान हाच उपाय आहे. उठताबसता, जातायेता, सर्व देहव्यापारात, आणि झोपेतसुद्धा अखंड रामनामस्मरण चालू असावे. रामनामाचा विसर पडून वृत्ती विषयासक्त होण्यास सवडच देऊ नये.

पुढे पहा...

## मोक्षप्राप्तीचे रहस्य...

श्रीरामाला मनापासून आळवून प्रार्थना करावी की, हे रामा, हे दयानिधे, माझा उद्धार कधी करशील? तुझी सगुण मूर्ती मला कधी दिसेल? रामा, मला त्वरित दर्शन दे. तुझ्या दर्शनाविना मला चैन पडत नाही. रामा, मी परम पापी आहे, माझ्यासारखा वाईट जगात कोणी नाही. हे दयार्णवा, या भवसागरांतून मला शीघ्र पार ने. मला संतती, संपत्ती, इत्यादि ऐहिक, अशाश्वत सुख काहीच नको, मला तुझ्या चरणी दृढ भक्ती दे. माझ्या जिव्हाग्री नेहमी तुझे नाम वसो, माझे कान तुझी कथा ऐकोत, माझे मस्तक तुझ्या चरणी नत असो, माझ्या हातांनी तुझी पूजा घडो, माझ्या पायांना तुझी प्रदक्षिणा घडो. रामा, मी अज्ञानी आहे, विवेकशून्य आहे; तूंच माझ्या हृदयात वसावे, आणि तुझ्या चरणी मला प्रेम उत्पन्न होईल असे करावे. श्रीरामा, तुझ्यावांचून मला कोणाचा आधार नाही. मला माता, पिता, आप्त, जिवलग सर्व तूंच आहेस. हे कृपासागरा, अज्ञाननाशका श्रीरामा, तूंच माझे रक्षण कर. अशी तळमळून प्रार्थना करून त्याला अनन्यभावाने शरण जावे.

पापमार्गाकडे प्रवृत्ती ठेवू नये, पापकर्माकडे वळू नये. जननिंदेचा खेद मानू नये, जनस्तुतीचा आनंद मानू नये. प्राणिमात्रात भगवंत वसत असल्यामुळे कोणाची निंदा-स्तुती न करावी. बायकामुले, घरदार, जमीनजुमला, संपत्ती, इत्यादि सर्व दृश्य गोष्टी मिथ्या, अशाश्वत आहेत हे समजून राहावे. एक भगवंतच तेवढा सत्य आणि शाश्वत आहे हे जाणून अहोरात्र रामभजनांतच आपला काळ घालवावा.

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

सदा सर्वदा योग तूझा घडावा । तुझे कारणी देह माझा पडावा ॥
उपेक्षूं नको गुणवंता अनंता । रघूनायका मागणे हेचि आतां ॥1॥

ज्या ज्या स्थळी हे मन जाय माझें । त्या त्या स्थळीं हे निजरूप तूझे ॥
मी ठेवितो मस्तक ज्या ठिकाणी । तेथे तुझे सद्गुरू पाय दोन्ही ॥2॥

जयाचा जनीं जन्म नामार्थ झाला । जयाने सदा वास नामांत केला ॥
जयाच्या मुखी सर्वदा नामकीर्ती । नमस्कार त्या ब्रह्मचैतन्यमूर्ती ॥3॥

॥ सद्गुरू नाथ महाराज की जय ॥ जय जय रघुवीर समर्थ ॥